# कृषी उत्पन्न बाजार समिती, मंगरूळपीर
# ता. मंगरूळपीर जि. वाशीम
# सरळसेवा पदभरती

कृषी उत्पन्न बाजार समिती, मंगरूळपीर जि. वाशीम यांचे आस्थापनावरील खाली दिलेल्या संवर्गातील रिक्त पदांवर नियुक्तीसाठी पात्र उमेदवारांकडून केवळ ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

ऑनलाईन अर्ज सादर करण्याचे संकेतस्थळ :- www.apmcmangrulpir.in

| अ.क्र. | पदाचे नाव | पद संख्या व प्रवर्ग | आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|
| १. | लेखापाल | १ पद खुला प्रवर्ग | शासन मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेतील पदवी तसेच MS-CIT किंवा समतुल्य संगणक कोर्स प्रमाणपत्र आवश्यक. |
| २. | निरीक्षक | १ पद खुला प्रवर्ग | शासन मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेतील पदवी तसेच MS-CIT किंवा समतुल्य संगणक कोर्स प्रमाणपत्र आवश्यक. |
| ३. | कनिष्ठ लिपिक | १ पद अ.जा. प्रवर्ग<br>१ पद वि. जा. (अ) प्रवर्ग<br>१ पद सा. शै. मा. प्र. प्रवर्ग<br>१ पद खुला प्रवर्ग | शासन मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेतील पदवी तसेच MS-CIT किंवा समतुल्य संगणक कोर्स प्रमाणपत्र आवश्यक. |
| ४. | चौकीदार | १ पद वि. जा. (अ) प्रवर्ग<br>१ पद इ. मा. व. प्रवर्ग | एस. एस. सी ( १० वी ) उत्तीर्ण आवश्यक. |

## सरळसेवा पदभरती वेळापत्रक

| अ.क्र. | कार्यवाहीचा टप्पा | दिनांक व कालावधी |
|---|---|---|
| १. | ऑनलाईन अर्ज सादर करण्याचा कालावधी | दि. १९-०३-२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजल्यापासून ते दि. ०२-०४-२०२५ रोजी सायंकाळी ११.५९ वाजेपर्यंत |
| २. | ऑनलाईन पद्धतीने विहित परीक्षा शुल्क भरणा करण्याची अंतिम दिनांक | दि. ०२-०४-२०२५ रोजी सायंकाळी ११.५९ वाजेपर्यंत |
| ३. | परीक्षा प्रवेश पत्र ऑनलाईन प्रिंट काढून घेणे | याबाबत संकेतस्थळावर सूचना प्रसिद्ध करण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| ४. | ऑनलाईन परीक्षेचा दिनांक | याबाबत संकेतस्थळावर सूचना प्रसिद्ध करण्यात येईल. |
| ५. | परीक्षेचा निकाल, कागदपत्र पडताळणी इत्यादी सूचना | संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. |

* आवश्यकतेनुसार वरील वेळापत्रकात बदल झाल्यास याबाबत वेळोवेळी www.apmcmangrulpir.in या संकेतस्थळावर सूचना प्रसिद्ध करण्यात येतील. अशा सूचनांचे वेळोवेळी अवलोकन करण्याची उमेदवारांनी दक्षता घ्यावी.

**परीक्षा शुल्क :-** राखीव प्रवर्गाकरिता – ७५०/-

खुला प्रवर्ग – १०००/-

**वयोमर्यादा :-**

| **वयोमर्यादा गणना दिनांक ०२-०४-२०२५** | **किमान वय** | **कमाल वयोमर्यादा** |
|---|---|---|
| राखीव प्रवर्ग | १८ वर्षे | ४३ वर्षे |
| खुला प्रवर्ग | १८ वर्षे | ३८ वर्षे |

## सरळसेवा पदभरती संदर्भात महत्वाच्या सूचना खालील प्रमाणे आहेत.

१. सर्व पदांकरिता स्वतंत्रपणे ऑनलाईन परीक्षा घेण्यात येईल.

२. उमेदवार एकापेक्षा अधिक संवर्गासाठी अर्ज करावयाचे असल्यास अश्या प्रत्येक संवर्गासाठी स्वतंत्र्य ऑनलाईन अर्ज सादर करावा लागेल. त्यासाठी स्वतंत्र ऑनलाईन परीक्षा शुल्क भरणे बंधनकारक राहील.

३. पात्र उमेदवाराने कृषी उत्पन्न बाजार समितीचे www.apmcmangrulpir.in या संकेतस्थळावर दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करून ऑनलाईन अर्ज सादर करावा. प्रस्तुत पदांसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीनेच स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही पद्धतीने प्राप्त झालेला अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

४. उमेदवाराने संपूर्ण जाहिरातीचे वाचन करूनच अर्ज भरावा. संपूर्ण भरलेला अर्ज Submit केल्यानंतर त्या अर्जाची Printout काढावी. सदरील अर्ज उमेदवाराने स्वताजवळ निवड प्रक्रियेसाठी जतन करून ठेवावा. सदरील अर्ज व शैक्षणिक कागदपत्रे या कार्यालयात पोस्टाने पाठवू नयेत.

५. परीक्षा शुल्क ना-परतावा आहे.

६. परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतल्या जाणार नाही.

७. राखीव प्रवर्गातील उमेदवारांकडे अर्ज भरतांना / निवड प्रक्रीयेच्यावेळी नॉनक्रिमिलेअर प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र ( Domicile Certificate ) व जात प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

८. उमेदवाराने ऑनलाईन परीक्षेत मिळविलेल्या गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार विचारक्षेत्रातील उमेदवारांना कागदपत्रे पडताळणी करिता बोलविण्यात येईल त्यावेळेस उमेदवाराने ऑनलाईन अर्ज सादर करतांना जी शैक्षणिक माहिती सादर केलेली आहे तीच कागदपत्रे ग्राह्य धरण्यात येईल. सदर कागदपत्र पडताळणी करिता बोलविण्यात आल्यास निवड झाली असा उमेदवाराला दावा करता येणार नाही.

९. उमेदवारांना ऑनलाईन परीक्षा तसेच कागदपत्र पडताळणीला स्वखर्चाने हजर राहावे लागेल.

१०. उमेदवारा विरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल झाला असल्यास किंवा पूर्वी एखाद्या प्रकरणात फौजदारी न्यायालयाने शिक्षा ठोठावली असल्यास त्याबाबत सविस्तर माहिती द्यावी. खरी माहिती दडवून ठेवल्यास किंवा अर्जात चुकीची माहिती भरल्याचे प्रशानासास निदर्शनास आल्यास कोणत्याही टप्प्यावर उमेदवाराची नियुक्ती अपात्र ठरविण्यात येईल.

११. जाहिरातीतील कोणत्याही पदावर निवड करून घेण्यासाठी उमेदवाराने अयोग्य मार्गाचा अवलंब केल्यास संबंधित उमेदवाराला भरती प्रक्रियेतून अपात्र ठरविण्यात येईल.

१२. भरतीप्रक्रीयेदरम्यान वेळोवेळी संकेतस्थळ पाहून भरती प्रक्रियेच्या माहिती बाबत अद्यावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

१३. अर्ज करतांना उमेदवारांनी Valid असलेल्या मोबाईल क्रमांक व ई-मेल आय.डी. सक्रीय असायला हवा. तसेच मोबाईल क्रमांक हा ( DND Activate ) नसावा. संदेशवहनात येणाऱ्या तांत्रिक अडचणीमुळे SMS / Email उमेदवार पर्यंत पोहचू शकत नाही, त्याकरिता कृषी उत्पन्न बाजार समिती, मंगरूळपीर जबाबदार राहणार नाही.

१४. उमेदवारांची ऑनलाईन परीक्षा हि कोणत्याही शैक्षणिक कागदपत्रांची पूर्व तपासणी / छाननी न करता घेण्यात येणार आहे. त्यामुळे परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे निवडीबाबत कोणत्याही प्रकारचा हक्क राहणार नाही. किंवा त्याबाबत उमेदवाराला तक्रार करता येणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१५. ऑनलाईन परीक्षेचे ठिकाण व दिनांक संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. याबाबत कोणताही पत्रव्यवहार केल्या जाणार नाही.

१६.  जाहिरात मध्ये नमूद केलेल्या पदांच्या संख्या, आरक्षण, परीक्षा स्थगित करणे, रद्द करणे किंवा अंशत: बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार सभापती / सचिव कृषी उत्पन्न बाजार समिती, मंगरूळपीर यांना राहतील व या संदर्भातील त्यांचा निर्णय अंतिम राहील, याबाबत उमेदवारास कोणताही दावा करता येणार नाही.

१७. उमेदवारांना अर्ज भरतांना तांत्रिक अडचण किंवा शंका निर्माण झाल्यास संकेतस्थळावर दिलेल्या Helpline क्रमांकावर फोन करून मदत घ्यावी.

**सचिव** **सभापती**

**कृषी उत्पन बाजार समिती, मंगरूळपीर जि. वाशीम**